महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार
रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail: cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्र- २०** दिनांक ०९/०२/२०२१

# भाडेकरुंची माहिती पोलीस ठाणेस देणेबाबत फौजदारी दंड प्रक्रीया संहीता कलम १४४(१)(२) अन्वये आदेश निर्गमित

मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयात स्थलांतरित नागरिकांचे वास्तव्याचे प्रमाणात मोठया संख्येने वाढ झालेली आहे. स्थलांतरित इसमांना घर, सदनिका, हॉटेल, जागा, इत्यादी भाडे तत्वावर देतांना संबंधीत घरमालक हे भाडेकरुंच्या ओळखीबाबत कोणतीही शहानिशा न करता नागरिकांना घरे भाडयाने देतात व त्यांचेकडून ओळखीबाबत कोणतेही कागदपत्रे घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे. त्यापैकी काही लोक अवैध व्यवसाय, गुन्हे व समाज विरोधी कृत्यांमध्ये सामील असल्याचे दिसुन आले आहेत अशा काही इसमांमुळे निर्माण होऊ शकणा-या संकटावर प्रतिबंध करण्यासाठी त्यांची माहिती पोलीस ठाणेस अद्यावत करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील निवासी क्षेत्रात घरमालक यांनी सदनिका/फ्लॅट, घर, दुकाने, हॉटेल, जागा भाडयाने देण्यापुर्वी भाडेकरुची शहानिशा करुन संबंधीत पोलीस ठाण्यास अवगत भाडेकरुंची माहीती सादर करणे बाबत सीआरपीसी १४४ (१) (३) अन्वये आदेश निर्गमित करण्यात आला आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे हद्दीतील नागरिकांनी निवासी क्षेत्रामध्ये सदनिका/फ्लॅट, घर, दुकाने, हॉटेल, जागा इत्यादी नागरिकांना भाडेतत्वावर देतांना संबंधीत मालकांनी, भाडेकरु इसमांनी व इस्टेट एजंट यांनी खालील नमुद मुद्दयांची माहिती संबंधीत पोलीस ठाणेस पुरवावी असे आदेश देण्यात आले आहे.

१) भांडेकरुंच्या ओळखीबाबत त्याचे मुळ वास्तव्याचा पुरावा किंवा ओळखपत्राचा पुरावा,
२) परकिय नागरिकासंदर्भाने त्याचे पासपोर्टची झेरॉक्स आणि व्हिजाची झेरॉक्स,
३) भाडेकरु इसमांचे नजीकच्या काळातील छायाचित्र,
४) भाडेकरु इसमांचे मुळ वास्तव्याचा पत्ता, तेथील पोलीस ठाणेचे नाव, नोकरीचे/व्यवसायाचे ठिकाण असे कागदपत्रे प्राप्त करुन संबंधीत पोलीस ठाणेस ०३ दिवसांचे आत माहिती द्यावी.

भाडेकरु इसमांची माहिती संबंधीत पोलीस ठाणेचे ईमेलवर, टपालाद्वारे किंवा पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईट www.mbvv.mahapolice.gov.in वर द्यावी. जे कोणी सदर आदेशाचा भंग करतील ते भारतीय दंड संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरतील.

----------ooooo---------